NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या १४३ व्या नियमित बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि. १५ फेब्रुवारी, २०२२ सकाळी ११:०० वा.



प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १४३ वी बैठक मंगळवार, दि.१५ फेब्रुवारी, २०२२ सकाळी ११:०० वा. व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - कुलगुरु | अध्यक्षा |
| २) | डॉ. वि. बा. पाटील - प्रभारी प्र-कुलगुरु | सदस्य |
| ३) | प्रा. म. म. माने | सदस्य |
| ४) | डॉ. वि. पां. शिखरे | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. शं. कि. पाटील | सदस्य |
| ६) | प्रा. डॉ. वि. भा. घुटे | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. सं. वि. कोटी | सदस्य |
| ८) | डॉ. ह. कृ. आवताडे | सदस्य |
| ९) | श्री. अ. कि. आवळे | सदस्य |
| १०) | डॉ. ब. पां. रोंगे | सदस्य |
| ११) | ॲड श्रीमती नी. सु. मंकणी | सदस्या |
| १२) | कु. अ. चं. चव्हाण | सदस्या |
| १३) | डॉ. अ. उ. उबाळे, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी) | सदस्य |
| १४) | सीए श्रेणीक शहा - वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित |
| १५) | डॉ. शि. सु. गणपूर - संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित |
| १६) | डॉ. सु. कि. पवार - प्र.कुलसचिव | सदस्य-सचिव |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

प्र. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. तसेच प्रा. डॉ. वि. बा. पाटील, प्रभारी प्र.कुलगुरु यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे स्वागत करण्यात आले.

**अनुपस्थिती:**

डॉ. ता. ना. कोळेकर यांनी दुरध्वनीद्वारे/ई-मेलद्वारे अनुपस्थित राहण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेऊन मान्यता देण्यात आली. तसेच प्राचार्य डॉ. अ. बा. शिंगाडे, डॉ. एस. सी. मांडे - संचालक, नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्सेस, पुणे विद्यापीठ कॅम्पस, पुणे, डॉ. ध. र. माने, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व डॉ. द. व्यं. जाधव, विभागीय सहसंचालक, (तंत्र शिक्षण), पुणे हे व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

**निषेध:**

विद्यापीठाच्या १७ व्या दीक्षांत समारंभासाठी व विद्यापीठाच्या नॅक पुर्नमुल्यांकनांसाठी NAAC पीअर टीमच्या भेटीच्या वेळी काही व्यवस्थापन परिषद सदस्यांना आमंत्रित न केल्यामुळे डॉ. ह. कृ. आवताडे, श्री. अ. कि. आवळे, डॉ. ब. पां. रोंगे, ॲड श्रीमती नी. सु. मंकणी व कु. अ. चं. चव्हाण या व्यवस्थापन परिषद सदस्यांनी निषेध व्यक्त केला.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

विषय क्र.१ दि. २६ नोव्हेंबर, २०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १४२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे व केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेणे.

प्र.कुलसचिव यांनी दि. २६ नोव्हेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत व कार्यवाही अहवाल वाचून दाखविला असता, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव | दि. २६ नोव्हेंबर, २०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १४२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह सर्वानुमते वाचून कायम करण्यात आला व केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. |
| | • पान क्र. १५ व १६ वरील विषय क्र. १० मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. |
| | पूर्वीचा ठराव |
| | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभाराकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ व UGC Guidelines नुसार स्थानिक निवड समितीमार्फत एकूण ८२ तात्पुरती कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरणेबाबतची प्रक्रिया पूर्ण केल्याची बाब, तसेच कलम १०३(२)(च) नुसार, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |
| | दुरुस्त केलेला ठराव |
| | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभाराकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ व UGC Guidelines नुसार स्थानिक निवड समितीमार्फत एकूण ८२ तात्पुरती कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरणेबाबतची प्रक्रिया पूर्ण केल्याची बाब, तसेच कलम १०३(२)(च) नुसार, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.<br>सदर ठरावास डॉ. ह. कृ. आवताडे, श्री. अ. कि. आवळे, डॉ. ब. पां. रोंगे, ॲड श्रीमती नी. सु. मंकणी व कु. अ. चं. चव्हाण या सदस्यांनी भिन्न (Dissent) मताची नोंद केली. |
| | • पान क्र. २८ व २९ वरील विषय क्र. १८ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. |
| | पूर्वीचा ठराव |
| | दि.०५/१०/२०२१ रोजी झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र.१४(१) यास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून पदवी, पदविका प्रमाणपत्र मिळणेसाठीचे शुल्क अंतिम वर्षाच्या, अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांकडून अंतिम सत्राचा परीक्षा फॉर्म भरतेवेळी परीक्षा शुल्कासहीत पदवी प्रमाणपत्राचे शुल्क व DigiLocker वर प्रमाणपत्र डाटा अपलोड करण्यासाठी मिळून रु. ६००/- विद्यार्थ्याकडून स्विकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | दुरुस्त केलेला ठराव |
| | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून पदवी, पदविका प्रमाणपत्र मिळणेसाठीचे शुल्क अंतिम वर्षाच्या, अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांकडून अंतिम सत्राचा परीक्षा फॉर्म भरतेवेळी परीक्षा शुल्कासहीत पदवी प्रमाणपत्राचे शुल्क ६००/- रुपये विद्यार्थ्याकडून स्विकारण्यास व DigiLocker वर प्रती प्रमाणपत्र डाटा अपलोड करण्यासाठी वेळोवेळी शासन निर्देशानुसार विद्यार्थ्यांना आवश्यक शुल्क आकारण्याची परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | |
|---|---|
| विषय क्र.२ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४(६)(जे) नुसार, कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाच्या प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर. |

(टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४(६)(जे) नुसार, कुलसचिव यांनी विद्यापीठाच्या प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन माहे दि.०१ जुलै, २०२१ ते ३० डिसेंबर, २०२१ या कालावधीतील कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाचा विकास कार्यक्रमांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

| | |
|---|---|
| ठराव : | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (जे) नुसार, कुलसचिव यांनी सादर केलेल्या विद्यापीठाच्या दि.०१ जुलै, २०२१ ते ३० डिसेंबर, २०२१ या कालावधीतील सहा महिन्यांच्या विकास कार्यक्रम अहवालाची दुरुस्तीसह नोंद घेण्यात आली. |

**विषय क्र.३ शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता सर्व संलग्नित महाविद्यालयांसाठी द्वितीय सत्र आरंभाच्या सुधारीत केलेल्या तारखांना तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.**

(टिपणी: विद्यापीठ परिपत्रक क्र. पुअहोसोविसो / संलग्नता / २०२१ / ५९३७, दि.१३/०८/२०२१ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालये, विद्यापीठ परिसरातील संकुलांना व प्रशासकीय विभागांना शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षाच्या सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा कळविण्यात आले होते. परंतू, सद्य:स्थितीमध्ये कोविड-१९ चे निर्बंध शासनाने काही प्रमाणात शिथिल केल्याने, विद्यापीठ अनुदान आयोग व राज्यशासन (मा.शिक्षण मंत्री) यांच्या सूचनेनुसार व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता, बी.एड., बी.पी.एड., एम.एड., एम.पी.एड., एम.ए. एज्युकेशन व विधी या अभ्यासक्रमाचे द्वितीय सत्र आरंभ हे दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२२ ऐवजी दिनांक ०१ जानेवारी, २०२२ पासून सुरु करणे आवश्यक असल्याने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या द्वितीय सत्र आरंभाच्या तारखेमध्ये अंशत: तातडीने बदल करणे आवश्यक असल्याने, तातडीची बाब म्हणून मा.कुलगुरु यांची मान्यता घेऊन सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ परिसरातील संकुलांना दि.३०/१२/२०२१ रोजीच्या सुधारित परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता सर्व संलग्नित महाविद्यालयांसाठी द्वितीय सत्र आरंभाच्या सुधारीत केलेल्या तारखांना तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता सर्व संलग्नित महाविद्यालयांसाठी द्वितीय सत्र आरंभाच्या सुधारीत केलेल्या तारखांना तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.** |

विषय क्र.४ पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी शास्त्रीय उपकरण केंद्रामार्फत एक/दोन दिवशीय कार्यशाळेचे नियमितपणे आयोजन करुन प्रती विद्यार्थी रु.१००/- इतके शुल्क आकारणी करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वयेमा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.

(टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठांतर्गत शास्त्रीय उपकरण केंद्राकडील विविध उपकरणाद्वारे करण्यात येणारे रसायनाच्या नमुन्याचे परीक्षण, उपकरणांची माहिती विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास विविध महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी एक/दोन दिवशीय कार्याशाळा नियमितपणे आयोजित करण्यास आणि सदर कार्यशाळेस प्रती विद्यार्थी किमान रु.१००/- इतके शुल्क आकारणी करण्यासाठीच्या तसेच सदरच्या कार्यशाळेसाठी होणारा जमा/खर्च (Receipt/Expenditure) Workshop Expenses (Scientific Instrumentation Centre) नोंदीस्तव नवीन अंदाजपत्रकीय शिर्षक तयार करण्यासाठी दि.२९/११/२०२१ रोजी मा.कुलगुरु यांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तसेच नजिकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक नसल्याने व सदरची बाब तातडीची असल्याने, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दि.०३/१२/२०२१ रोजीच्या टिपणीन्वये मान्यता दिली आहे.

सबब, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी शास्त्रीय उपकरण केंद्रामार्फत एक/दोन दिवशीय कार्यशाळेचे नियमितपणे आयोजन करुन प्रती विद्यार्थी रु.१००/- इतके शुल्क आकारणी करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी शास्त्रीय उपकरण केंद्रामार्फत एक/दोन दिवशीय कार्यशाळेचे नियमितपणे आयोजन करुन प्रती विद्यार्थी रु.१००/- इतके शुल्क आकारणी करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली. |

विषय क्र.५ **प्रस्तुत विद्यापीठात कार्यरत असलेल्या नियमित / कंत्राटी महिला अधिकारी / कर्मचारी व परिसरातील विविध संकुलात शिक्षण घेणाऱ्या व मुलींच्या वसतिगृहात वास्तव्यास असणाऱ्या विद्यार्थीनींकरिता स्त्री डॉक्टरांची मानसेवी तत्वावर डॉक्टर म्हणून नियुक्ती देणेबाबत तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात कार्यरत असलेल्या नियमित/कंत्राटी अधिकारी/कर्मचारी व परिसरातील विविध संकूलात शिक्षण घेणाऱ्या व मुलींच्या वसतिगृहात वास्तव्यास असणाऱ्या करिता आरोग्य केंद्र आहे. या आरोग्य केंद्रामध्ये एक वैद्यकीय अधिकारी व एक मिश्रक (कंपाऊंडर) कार्यरत आहेत.

तसेच विद्यापीठाच्या आरोग्य केंद्राकरिता वैद्यकीय अधिकाऱ्याचे एक पद मंजूर असून स्त्री डॉक्टरांची नियमित नियुक्ती करण्याकरिता अद्याप पद मंजूर नाही. त्यामुळे स्त्री डॉक्टरांची मानसेवी तत्वावर नियुक्ती करावी लागणार असल्याने व प्रस्तुत विद्यापीठाचे नॅक मूल्यांकनासाठी नॅक पीअर टीम दि.२०/०१/२०२२ ते दि.२२/०१/२०२२ या कालावधीत विद्यापीठास भेट देणार आहे. त्यावेळी विद्यापीठात कार्यरत असलेल्या नियमित/कंत्राटी महिला अधिकारी/कर्मचारी व विद्यार्थीनीकरिता स्वतंत्र स्त्री डॉक्टरांची नियुक्ती केल्याची बाब ही एक उल्लेखनीय बाब ठरु शकेल. त्याअनुषंगाने श्रीमती डॉ.मीना विठ्ठल माने यांची मानसेवी डॉक्टर म्हणून ०६ महिन्याच्या कालावधीकरिता पूर्णत: तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर दरमहा रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) इतक्या एकत्रित मानधनावर व विविध अटींच्या अधिन राहून नियुक्ती करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक होते. परंतु, दरम्यानच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक आयोजित होण्याची शक्यता नसल्याने व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा.कुलगुरु यांनी कार्यवाही करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार संबंधितांना दि.१३/०१/२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठात कार्यरत असलेल्या नियमित/कंत्राटी महिला अधिकारी/कर्मचारी व परिसरातील विविध संकुलात शिक्षण घेणाऱ्या व मुलींच्या वसतिगृहात वास्तव्यास असणाऱ्या विद्यार्थीनींकरिता स्त्री डॉक्टरांची मानसेवी तत्वावर डॉक्टर म्हणून नियुक्ती देणेबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठात कार्यरत असलेल्या नियमित / कंत्राटी महिला अधिकारी / कर्मचारी व परिसरातील विविध संकुलात शिक्षण घेणाऱ्या व मुलींच्या वसतिगृहात वास्तव्यास असणाऱ्या विद्यार्थीनींकरिता स्त्री डॉक्टरांची मानसेवी तत्वावर डॉक्टर म्हणून नियुक्ती देणेबाबत तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घ्यावी.** |

**विषय क्र.६ महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.१९/०९/२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत विद्यापीठाला मंजूर पदांपैकी गट 'ड' मधून गट 'क' कनिष्ठ लिपिक या संवर्गामध्ये पदोन्नतीकरीता रिक्त असलेल्या जागेवर पदोन्नती प्रक्रिया राबविणेकामी धोरण ठरविण्यासाठी व अनुषंगिक मार्गदर्शक तत्वे (Guidlines) तयार करणेकामी गठीत समितीचा दि.१७/१२/२०२१ रोजीचा अहवाल विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दि.१९/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे प्रस्तुत विद्यापीठाला गट अ ते ड याप्रमाणे वेगवेगळ्या संवर्गाकरीता एकुण २१० पदे मंजूर केले आहेत. त्यामध्ये गट ड मध्ये प्रयोगशाळा परिचर, ग्रंथालय परिचर, वाहन चालक, जमादार, हवालदार, झेरॉक्स ऑपरेटर, चौकीदार, शिपाई व स्वच्छक या संवर्ग तथा पदांचा समावेश आहे.

प्रस्तुत विद्यापीठामध्ये यापूर्वी गट क मधील कनिष्ठ लिपिक या संवर्गामध्ये पदोन्नती देताना केवळ शिपाई या संवर्गातील कर्मचाऱ्यांना संधी देण्यात आलेली असून प्रयोगशाळा परिचर, ग्रंथालय परिचर, वाहनचालक, जमादार, हवालदार, झेरॉक्स ऑपरेटर, चौकीदार व स्वच्छक या संवर्गातील कर्मचाऱ्यांना संधी देण्यात आलेली नाही. त्यास अनुसरुन कनिष्ठ लिपिक या संवार्गमध्ये पदोन्नती कोट्याकरीता रिक्त असलेल्या पदांवर पदोन्नती मिळणेकामी वेगवेगळ्या निवेदनानुसार प्रस्तुत विद्यापीठातील शिपाई, प्रयोगशाळा परिचर, ग्रंथालय परिचर व झेरॉक्ट ऑपरेटर या संवर्गातील कर्मचारी व वे वेगवेगळ्या संघटनांनी वेगवेगळ्या शासन निर्णयाचा, शासन आदेशांचा व शासन अधिसूचनेचा संदर्भ देऊन कनिष्ठ लिपिक या संवर्गामध्ये पदोन्नती मिळणेकामी विनंती केलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे प्रयोगशाळा परिचर, ग्रंथालय परिचर व झेरॉक्स ऑपरेटर या संवर्गातील कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विनंती अर्जामध्ये नमूद केलेल्या महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१५/०४/१९९१, दि.१०/०५/२००५ व महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचे दि.१४/०१/२०१६ रोजीच्या शासन निर्णयांचे अवलोकन केले असता, त्यामध्ये गट ड मधील कर्मचाऱ्यांना गट क मध्ये पदोन्नती देता येत असल्याचे नमूद असून त्यामध्ये गट ड मधील कोणत्याही विशिष्ट संवर्ग तथा पदांचा उल्लेख करण्यात आलेला नसल्यामुळे प्रस्तुत विद्यापीठामध्ये प्रयोगशाळा परिचर, ग्रंथालय परिचर व झेरॉक्स ऑपरेटर या संवर्गातील कार्यरत कर्मचाऱ्यांनी गट क मधील कनिष्ठ लिपिक या संवर्गामध्ये पदोन्नती मिळणेबाबत वारंवार विनंती करीत आहेत. तसेच प्रस्तुत विद्यापीठामध्ये गट क मध्ये पदोन्नतीकरीता रिक्त असलेल्या पदांवर पदोन्नती देणेकामी दि.२६/०७/२०१८ रोजी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीमध्ये विषय क्रमांक ४ ला अनुसरुन खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आलेले आहेत.

| | |
|---|---|
| ठराव क्र. ४ (२) | महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार - अ, सामान्य प्रशासन विभाग दि.०६/०६/२०१७ नुसार श्री. हुक्कीरे रविकांत गुरुनाथ, झेरॉक्स ऑपरेटर यांच्या विनंती अर्जाचा विचार करण्यात येऊन त्यांचे नांव शिपाई संवर्गातील सेवाजेष्ठता यादीमध्ये त्यांचे रुजू दिनांकानुसार समाविष्ठ करण्यात यावे असे ठरले. |
| ठराव क्र. ४ (३): | विद्यापीठात कार्यरत ग्रंथालय परिचर व प्रयोगशाळा परिचर यांना शिपाई या संवर्गाच्या सेवाजेष्ठता यादीमध्ये सर्वात शेवटी रुजू दिनांकानुसार समाविष्ठ करुन येथून पुढे रिक्त होणाऱ्या कनिष्ठ लिपिक पदासाठी त्यांचा विचार सेवाजेष्ठतेनुसार करावा असे सर्वानुमते ठरले. अर्जदार कर्मचारी यांचेकडून सहमती घेऊन पुढील कार्यवाही करावी. |

उपरोक्त बाबीला अनुसरुन या कार्यालयाकडून दि.२६/०९/२०१९ रोजीच्या पत्रान्वये गट ड मधील शिपाई संवर्ग वगळता इतर कर्मचाऱ्यांना गट क मधील कनिष्ठ लिपिक या संवर्गामध्ये

पदोन्नती देता येईल का? याबाबत मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांना विचारणा केली असता, त्यांनी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे दि.०६/०६/२०१७ रोजीचे राजपत्र क्रमांक ९० व ९१ हे अधिसूचना शासनाच्या विभागातील व त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांना लागू असल्याचे नमूद आहे. अशासकीय कर्मचाऱ्यांना सदरची तरतुद लागू नसल्याचे अभिप्राय देता येत नाहीत असे अभिप्राय दिलेला आहे.

गट ड मधून गट क मधील कनिष्ठ लिपिक या संवर्गामध्ये देण्यात येणाऱ्या पदोन्नतीबाबत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडे चौकशी केली असता, त्यांच्या आस्थापनेकडे गट ड मध्ये कार्यरत सर्व पदांची एकत्रित सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द करुन त्यानंतर गट ड मधील सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांना गट क मधील कनिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नती देण्यात येत असल्याचे दिसून येते.

वर नमूद प्रमाणे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१५/०४/१९९१, दि.१०/०५/२००५ व महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचे दि.१४/०१/२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदी व प्रस्तुत विद्यापीठातील दि.२६/०७/२०१८ रोजीच्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीतील ठराव क्र. ४(१) व ४(२) ला अनुसरुन प्रस्तुत विद्यापीठामध्ये गट ड मध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांचे गट क मधील कनिष्ठ लिपिक या संवर्गामध्ये पदोन्नती देणेकामी धोरण ठरविण्यासाठी व अनुषंगिक मार्गदर्शक तत्वे (Guidlines) ठरवून त्याबाबत अहवाल सादर करणेकामी मा.कुलगुरु महोदयांनी खालीलप्रमाणे पाच सदस्यीय समिति गठीत केलेली होती.

१) डॉ. संतोष विजयकुमार कोटी (अध्यक्ष)
२) प्रा. राजेश गाडेवार (सदस्य)
३) श्री. निवास एस. माने (सदस्य)
४) श्री. दिलीप भरड (सदस्य)
५) श्री. हुशारसिंग शंकरसिंग साबळे (सदस्य)

उपरोक्त समितीची दि.१७/१२/२०२१ रोजी सकाळी ११.०० वा. बैठक संपन्न झालेली असून सदर बैठकीस उक्त सदस्यांमधील श्री. हुशारसिंग शंकरसिंग साबळे वगळता बाकी सर्वजण उपस्थित होते. सदर समितीला पुरविण्यात आलेल्या सर्व शासन निर्णय, शासन पत्र, शासन अधिसूचना, वेगवेगळया संघटनेचे व कर्मचाऱ्यांचे निवेदनांचा विचार करुन समिती अध्यक्षांनी त्यांचा अहवाल सादर केलेला असून सदर अहवाल सोबत जोडलेला आहे.

सबब, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.१९/०९/२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत विद्यापीठाला मंजूर पदांपैकी गट ड मधील कनिष्ठ लिपिक या संवर्गामध्ये पदोन्नतीकरीता रिक्त असलेल्या जागेवर पदोन्नती प्रक्रिया राबविणेकामी धोरण ठरविण्यासाठी व अनुषंगिक मार्गदर्शक तत्वे (Guidlines) तयार करणेकामी गठीत समितीचा दि.१७/१२/२०२१ रोजीचा अहवाल विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | **महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.१९/०९/२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत विद्यापीठाला मंजूर पदांपैकी गट 'ड' मधून गट 'क' कनिष्ठ लिपिक या संवर्गामध्ये पदोन्नतीकरीता रिक्त असलेल्या जागेवर पदोन्नती प्रक्रिया राबविणेकामी धोरण ठरविण्यासाठी व अनुषंगिक मार्गदर्शक तत्वे (Guidlines) तयार करणेकामी गठीत समितीचा दि.१७/१२/२०२१ रोजीचा अहवाल स्विकारुन, सेवाजेष्ठता यादी तयार करणेकामी मार्गदर्शक सूचनांमधील अ.क्र. ४ मध्ये खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**४. सेवाजेष्ठता यादी तयार करताना सध्या लागू असणारे व भविष्यात पारित होणारे सर्व शासन निर्देश लागू राहतील.** |

विषय क्र.७ दि.३१/१२/२०२१ रोजी विद्या परिषदेच्या बैठकीत विषय क्र. २३ वर पारित झालेल्या ठरावानुसार विद्यापीठ परिसरात प्रभारी अधिष्ठाता, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा यांनी त्यांच्या दि.२३/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये विनंती केल्यानुसार फक्त M.P.Ed. हा नवीन अभ्यासक्रम २० प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यासंदर्भात विद्या परिषदेने शिफारस केल्याची बाब विचारार्थ.

(टिपणी: प्रभारी अधिष्ठाता, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा यांनी दि.२३/१२/२०२१ रोजीच्या पत्रानुसार विद्यापीठ परिसरात B.P.Ed आणि M.P.Ed अभ्यासक्रम सुरु करण्यासंदर्भात विनंती केल्यानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३(१)(च) प्रमाणे दि.३१/१२/२०२१ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीत विषय क्र. २३ अन्वये विषय ठेवला असता, खालीलप्रमाणे ठराव पारित केला आहे.

ठराव: विद्यापीठ परिसरात मा.प्रभारी अधिष्ठाता, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा यांनी त्यांच्या दिनांक २३/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये विनंती केल्यानुसार फक्त M.P.Ed. हा नवीन अभ्यासक्रम २० प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३३(१) (च) नुसार सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.

सबब, विद्या परिषदेने विद्यापीठ परिसरात M.P.Ed हा नवीन अभ्यासक्रम २० प्रवेश क्षमतेसह सुरु करणे संदर्भात केलेली शिफारस विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | प्रस्तुत विद्यापीठ परिसरात M.P.Ed. हा नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३(१)(च) नुसार विद्या परिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच सदर अभ्यासक्रमास ३० विद्यार्थी प्रवेश क्षमता निश्चित करण्यात आली. |

विषय क्र.८ **सन २०२३-२४ या वर्षापासून विद्यापीठ तसेच सर्व संलग्न महाविद्यालयातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांच्या अपघाती रक्कमेत रु.१०,००,०००/- ऐवजी रु.२०,००,०००/- तसेच किरकोळ अपघातात मिळणारी मेडीक्लेमची रक्कम रु.१,००,०००/- ऐवजी रु. २,००,०००/- अशी वाढ करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठ स्थापनेपासून विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांचा विमा उतरविण्याची कार्यवाही विद्यार्थी विकास विभागाकडून करण्यात येते. दरम्यान शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांचा अपघाती मृत्यू झाल्यास कर्मचाऱ्याच्या वारसदारास रु.१०,००,०००/-इतकी रक्कम विमा कार्यालयाकडून अदा करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते. यासाठी शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्याकडून प्रति वर्षी विमा दरपत्रकानूसार काही रक्कम एकदाच वार्षिक विमा प्रिमीयमच्या स्वरुपात आकारण्यात येते. सन २०१७-१८ या वर्षापासून विमा अपघातानंतर मिळणाऱ्या रक्कमेत वाढ करण्यात येवून शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचा अपघाती मृत्यू झाल्यास वारसास रु.१०,००,०००/- इतकी रक्कम तसेच किरकोळ अपघातात रु.१,००,०००/- पर्यंतचा झालेला खर्च विमा कंपनीकडून अदा करण्यात येतो. आज रोजी विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांची संख्या किमान ३००० इतकी आहे. दुर्देवाने एखाद्या कर्मचाऱ्याचा अपघात झाल्यास त्याला या योजनेचा फायदाच मिळणार आहे. तथापि, सध्या असलेली महागाई तसेच शिक्षक तसेच कर्मचारी यांच्या मृत्यू पश्च्यात त्याच्या कौटुंबीक गरजांचा व सर्व खर्चाचा विचार करता, सन २०२२-२३ या वर्षापासून विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांच्या अपघाती विमा क्लेमच्या रक्कमेत रु.१०,००,०००/- ऐवजी रु.२०,००,०००/- तसेच किरकोळ अपघातात मिळणारी रक्कम रु.१,००,०००/- ऐवजी रु.२,००,०००/- अशी वाढ करण्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | सन २०२३-२४ या वर्षापासून विद्यापीठ तसेच सर्व संलग्न महाविद्यालयातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांच्या अपघाती रक्कमेत रु.१०,००,०००/- ऐवजी रु.२०,००,०००/- तसेच किरकोळ अपघातात मिळणारी मेडीक्लेमची रक्कम रु.१,००,०००/- ऐवजी रु. २,००,०००/- अशी वाढ करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

विषय क्र.९ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिनी दरवर्षी एकूण ५५ सुवर्णपदके विविध विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस प्रदान करण्यात येतात. सद्य:स्थितीत कोरोना महामारीच्या प्रादूर्भावामूळे बँकेतील मुदत ठेवीचे व्याजदर कमी झाले आहेत व सोने आणि चांदीच्या दरामध्ये वाढ झाली असल्याने जमा होणारे व्याज व सुवर्णपदक तयार करुन घेण्यासाठी होणाऱ्या खर्चामध्ये अंदाजे रु.१,२५,०००/- इतकी तफावत निर्माण होत आहे. सबब यापुढे होणाऱ्या दीक्षांत समारंभासाठी सुवर्णपदके तयार करुन घेणेकामी होणाऱ्या खर्चासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब विचारार्थ.

(टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिनी दरवर्षी एकूण ५५ सुवर्णपदके विविध विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस प्रदान करण्यात येतात. दरवर्षी सदर ५५ सुवर्णपदके व्यवस्थापन परिषदेच्या दि.०६/१२/२०१८ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ३६ नुसार मे.आपटे ट्रेडर्स, मंगळवार पेठ, सोलापूर यांच्याकडून तयार करुन घेण्यात येतात.

सद्य:स्थितीत कोरोना महामारीच्या प्रादूर्भावामुळे बँकेतील मुदतठेवीचे व्याजदर कमी झाले आहे. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये सुवर्णपदकांच्या देणगी मुदत ठेवीवरील व्याज एकूण रु.३,०२,८१४/- इतके जमा झाले आहे. तसेच सोने आणि चांदीच्या दरामध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे सुवर्णपदके तयार करुन घेण्यासाठी होणाऱ्या खर्चामध्ये अंदाजे रू.१,२५,०००/- इतक्या रकमेची तफावत निर्माण झाली आहे. सद्य:स्थितीत एक सुवर्णपदक तयार करण्याकरिता १०५ ग्रॅम चांदी वापरण्यात येत असून त्यावर सोन्याचा मुलामा देण्यात येतो.

यापूर्वी एकूण ५४ देणगीदाराकडून प्रत्येकी रु.१,००,०००/- इतकी रक्कम सुवर्णपदकासाठी देणगी स्वरुपात प्राप्त झाली आहे. तसेच यावर्षी बालाजी अमाईन्स या संस्थेकडून नविन नियमावलीनुसार देणगी रक्कम रु.३,००,०००/- देणगी विद्यापीठास प्राप्त झाली आहे. सद्य:स्थितीत मुदत ठेवीवरील व्याजदर कमी झाल्याने आगामी दीक्षांत समारंभापासून विविध विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस प्रदान करण्यात येणाऱ्या एकूण ५५ सुवर्णपदकांच्या खर्चासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिनी दरवर्षी एकूण ५५ सुवर्णपदके विविध विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस प्रदान करण्यात येतात. सद्य:स्थितीत कोरोना महामारीच्या प्रादूर्भावामूळे बँकेतील मुदत ठेवीचे व्याजदर कमी झाले आहेत व सोने आणि चांदीच्या दरामध्ये वाढ झाली असल्याने जमा होणारे व्याज व सुवर्णपदक तयार करुन घेण्यासाठी होणाऱ्या खर्चामध्ये अंदाजे रु.१,२५,०००/- इतकी तफावत निर्माण होत आहे. त्यामुळे यापुढे होणाऱ्या दीक्षांत समारंभासाठी सुवर्णपदके तयार करुन घेणेकामी होणारा अतिरिक्त खर्च, विद्यापीठ फंडातून करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

विषय क्र.१० **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये सन २०२२ मध्ये होणारी निवडणूक प्रक्रिया निर्विवादपणे व व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी एक तज्ज्ञ अधिकाऱ्याचे मानधन ठरविण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६२ नुसार दि.३१ ऑगस्ट, २०२२ रोजी प्रस्तुत विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणाचा/मंडळाचा कालावधी संपणार आहे.

महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२(१०), कलम ७१(१३) व कलम ६७ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, दि.१७ मे, २०१७ च्या राजपत्रानुसार एकरुप परिनियम क्रमांक १ “विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांच्या व मंडळांच्या निवडणुका घेण्याबाबची कार्यपध्दती) एकरुप परिनियम, २०१७” विहित केलेले आहे.

यामध्ये विहित केलेल्या नियमानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये विनिर्दीष्ट विविध प्राधिकरणावरील/मंडळावरील निवडणूकीसाठी (नोंदणीकृत पदवीधरांच्या नाव नोंदणीकरिता पदवीधर मतदार नोंदणीची जाहिरात देवून पदवीधर नोंदणी अर्ज ऑनलाईन फॉर्म व नोंदणीकृत पदवीधर म्हणून नोंदणी करण्याची प्रक्रिया सुरु करणे, अधिसभेवरील प्राचार्य, संस्था प्रतिनिधी, शिक्षक, पदव्युत्तर शिक्षक व विभागप्रमुखांची माहिती मागवून घेणे इत्यादी) निवडणूकीची प्रक्रिया सुरु करावी लागणार आहे.

सबब, निवडणूक प्रक्रिया निर्विवादपणे व व्यवस्थितपणे पार पाडणे अत्यंत गरजेचे असल्याने निवडणूक प्रक्रियेच्या कामकाजामध्ये निवडणूक प्रक्रियेची संपूर्ण माहिती असलेली व निवडणूक प्रक्रियेचे कामकाज केलेली तज्ज्ञ व्यक्ती अधिकारी म्हणून निवडणूकीचे कामकाज पूर्ण होईपर्यंत त्यांच्या सदर कामाचे मानधन ठरविण्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये सन २०२२ मध्ये होणारी निवडणूक प्रक्रिया निर्विवादपणे व व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठाचे कुलसचिव हे निवडणूक निर्णय अधिकारी असतील. कुलसचिव यांना निवडणूक कामासाठी आवश्यकतेनुसार अधिकारी/कर्मचारी, मा.कुलगुरू यांच्या आदेशानुसार घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच निवडणूकीसाठी येणारा खर्च अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार करण्याचे ठरले. |

विषय क्र.११ **विद्यापीठाचे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी लेखा परीक्षकांच्या पुर्ननियुक्तीची बाब विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १३५(२) नुसार व्यवस्थापन परिषदेने नियुक्त केलेल्या लेखा परिषकाकडून विद्यापीठाच्या लेख्याची लेखापरीक्षा करुन घेणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने दि.२० फेब्रुवारी, २०१९ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषद ठराव क्र.८ अन्वये M/s.SKVM & Company, CA Sachin S. Bhattad यांची सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी नियुक्ती करण्यात आली होती.

M/s. SKVM & Company, CA Sachin S. Bhattad यांनी विद्यापीठाचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी रु.१,२०,०००/- अधिक GST १८% सदर फी मध्ये GST व TDS रिटर्न भरणे इ.चा समावेश आहे. सोबत ई-मेल जोडला आहे.

सबब, M/s. SKVM & Company, CA Sachin S. Bhattad यांनी ई-मेलद्वारे विनंती केल्यानुसार त्यांची विद्यापीठाचे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्यासाठी संवैधानिक लेखापरीक्षक म्हणून पुर्ननियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | विद्यापीठाचे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे संवैधनिक लेखापरिक्षण करण्यासाठी M/s. SKVM & Company यांना मागील वर्षाच्या दराने पुर्ननियुक्ती देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

विषय क्र.१२ **सन २०२१-२२ च्या सुधारीत अर्थसंकल्पास व सन २०२२-२३ च्या मुळ अर्थसंकल्पास मान्यतेची बाब विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३३(१) नुसार प्रस्तुत विद्यापीठाचे सन २०२१-२२ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२२-२३ चा मूळ अर्थसंकल्प तयार करण्याकरिता समान लेखा संहिता कलम २.१२(i) नुसार मा.कुलगुरु यांचे मान्यतेने खालीलप्रमाणे उपसमिती गठीत करण्यात आली होती.

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | श्री. महेश एम. माने | अध्यक्ष |
| २ | डॉ. व्ही. बी. घुटे | सदस्य |
| ३ | डॉ. डी. डी. कुलकर्णी | सदस्य |
| ४ | सीए श्रेणिक शाह | सदस्य सचिव |

उपरोक्त उपसमितीने दि.०४ ते ०७/०१/२०२२ दरम्यान विविध विभाग/संकुल प्रमुखांसोबत त्यांची मागणी, जमा व खर्चाचे नियोजन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मागील तीन वर्षाची प्रत्यक्ष जमा व खर्च, त्यांची चालू वर्षातील प्रत्यक्ष जमा - खर्च व त्यांची मागणी तसेच पुढील वर्षातील होणारी जमा व खर्चाचे नियोजन व उपलब्ध निधी इ. बाबत आढावा घेण्यात आला व त्यानुसार सद्य:स्थितीत कोरोना महामारीमुळे उत्पन्नात होणारी घट तसेच आवर्ती खर्चात वरचेवर होणारी वाढ ही बाब विचारात घेऊन एकूण खर्चात कपात करुन सुधारित व मूळ अंदाजपत्रकीय अंदाज ठरविण्यात आले आहेत. सन २०२१-२२ चा सुधारित व सन २०२२-२३ चा मूळ मसूदा तयार करुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ९४(६)(क) नुसार वित्त व लेखा समितीच्या दि.३१/०१/२०२२ रोजी झालेल्या बैठकीसमोर विषय क्र.२ नुसार सादर केला असता, त्यावर सर्वंकष चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव | सन २०२१-२२ च्या सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२२-२३ च्या मूळ अर्थसंकल्पावर सर्वंकष चर्चा होऊन दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस करण्यात आली. |

सबब, विद्यापीठाचा सन २०२१-२२ च्या सुधारित अर्थसंकल्प व सन २०२२-२३ च्या मूळ अर्थसंकल्पास वित्त व लेखा समितीने दुरुस्तीसह केलेली मान्यतेची शिफारस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१(ज) नुसार विचारार्थ).

<table>
<tr><td>ठराव :</td><td>विद्यापीठाचा सन २०२१-२२ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२२-२३ च्या मूळ अर्थसंकल्पास वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन दुरुस्तीसह अधिसभेस बहुमताने शिफारस करण्यात आली.<br>सदर ठरावास डॉ. ह. कृ. आवताडे, श्री. अ. कि. आवळे, डॉ. ब. पां. रोंगे, ॲड श्रीमती नी. सु. मंकणी व कु. अ. चं. चव्हाण या सदस्यांनी खालील कारणांसाठी भिन्न (Dissent) मताची नोंद केली.<br>१. सदर आजची व्यवस्थापन परिषद बैठक यापूर्वी दि.११/०२/२०२२ रोजी ठरलेली होती. तथापि, अंदापजत्रक हे काही सदस्यांना उशिराने म्हणजेच शुक्रवार दि.११/०२/२०२२ व काही सदस्यांना त्यानंतर मिळालेले आहे. त्यामुळे अंदाजपत्रकाचा सखोल अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ मिळालेला नाही.<br>२. अंदाजपत्रकाचा सखोल अभ्यास झाल्याशिवाय त्याबाबत कोणतेही मत मांडणे उचित होणार नाही. तसेच ते विद्यापीठाच्या हिताचे होणार नाही. त्यामुळे पुरेसा वेळ देवून त्याबाबत व्यवस्थापन परिषदेची अंदाजपत्रकासाठी पुनश्च बैठक घ्यावी अशी रास्त मागणी मान्य न केल्यामुळे.</td></tr>
</table>

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

| | |
|---|---|
| विषय क्र. १३(१) | **प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविण्याकरिता खाजगी मनुष्यबळ पुरवठादार मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना मुदतवाढ देणेबाबत तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.** |

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरवठा करणारे मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना देण्यात आलेली मूदतवाढ दि.०५/०२/२०२२ रोजी संपणार आहे. तसेच सदरची ई-निविदाबाबतची कार्यवाही पूर्ण होण्यासाठी किमान तीन महिन्याचा कालावधी लागणार आहे.

सद्य:स्थितीत मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना मनुष्यबळ पुरवठा करण्याबाबत देण्यात आलेली मूदतवाढ दि.०५/०२/२०२२ रोजी संपणार असल्याने ई-निविदाची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अथवा दोन महिने यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी पूर्वीच्या सेवाशर्तीवर मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना मूदतवाढ देण्यासाठी मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेची बैठक दरम्यानच्या काळात आयोजित नसल्याने तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने संबंधित कंत्राटदारास दि.०६/०२/२०२२ पासून दोन महिने अथवा ई-निविदेची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्याकालावधीसाठी पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कानुसार मुदतवाढ देण्यात येत आहे असे दि.०४/०२/२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविण्याकरिता खाजगी मनुष्यबळ पुरवठादार मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना ई-निविदेची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अथवा दि.०६/०२/२०२२ पासून दोन महिने यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी पूर्वीच्या सेवाशर्ती व सेवाशुल्कानुसार मुदतवाढ देणेबाबत तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविण्याकरिता खाजगी मनुष्यबळ पुरवठादार मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना मुदतवाढ देणेबाबत तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.<br>तसेच ई-निविदाबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी आणखी एक महिन्याची मुदतवाढ देण्याचे ठरले. |

विषय क्र. १३(२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पाच वर्षासाठी तयार करण्यात आलेल्या प्रस्तुत विद्यापीठाच्या बृहत आराखडयातील वर्षनिहाय उद्दिष्टे काय होती व किती साध्य करण्यात आली. साध्य झाली नसल्यास त्या बाबतची कारणे यासह कार्यपूर्तता/साध्यता अहवाल तयार करण्यासाठी नियुक्त केलेल्या अभ्यास समितीने तयार केलेला अहवाल शासनास सादर करण्याची बाब विचारार्थ.

(टिपणी: मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांचे क्र.संकीर्ण -२०२१/प्र.क्र. ११६/ विशि - ५, दिनांक ०८/१२/२०२१ शासन पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पाच वर्षासाठी तयार करण्यात आलेल्या बृहत आराखडयातील शैक्षणिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१, व २०२१-२२ या तीन वर्षाच्या कालावधीतील वर्षनिहाय उद्दिष्टे काय होती व किती साध्य करण्यात आली. तसेच शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षामाध्ये कशाप्रकारे पुर्ण करता येतील याबाबतचा विद्यापीठाचा अहवाल शासनास सादर करणेबाबत आदेश प्राप्त झाले होते.

त्याअनुषंगाने सदरील कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करण्यासंदर्भात दि.१४/१२/२०२१ रोजी सादर करण्यात आलेल्या टिपणीवर मा.कुलगुरू यांनी नामनिर्देशन केल्यानुसार खालीलप्रमाणे अभ्यास समितीचे गठण करण्यात आले.

१) डॉ. व्ही. पी. शिखरे (अध्यक्ष)

२) प्राचार्य डॉ. एस. डी. नवले (सदस्य)

३) प्राचार्य डॉ. डी. एस. तिकटे (सदस्य)

४) प्राचार्य डॉ. एस. के. पाटील (सदस्य)

उक्त अभ्यास समितीची पहिली बैठक दिनांक २८/१२/२०२१ रोजी, दुसरी बैठक दिनांक ०३/०१/२०२२ रोजी व तिसरी बैठक दिनांक १४/०२/२०२२ रोजी सकाळी ११.३० वा. प्र.अधिष्ठाता डॉ. व्ही. पी. शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदरील अभ्यास समितीने सादर केलेला अहवाल शासनास पाठविणेकामी, शासन निर्देशानुसार व्यवस्थापन परिषदेमध्ये आढावा घेण्यास्तव सादर करणे आवश्यक आहे. यास्तव सदरील अहवाल या सोबत जोडला आहे.

सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पाच वर्षासाठी तयार करण्यात आलेल्या प्रस्तुत विद्यापीठाच्या बृहत आराखडयातील वर्षनिहाय उद्दिष्टे काय होती व किती साध्य करण्यात आली. साध्य झाली नसल्यास त्या बाबतची कारणे यासह कार्यपूर्तता/साध्यता अहवाल तयार करण्यासाठी नियुक्त केलेल्या अभ्यास समितीने तयार केलेला अहवाल शासनास सादर करण्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पाच वर्षासाठी तयार करण्यात आलेल्या प्रस्तुत विद्यापीठाच्या बृहत आराखडयातील वर्षनिहाय उद्दिष्टे काय होती व किती साध्य करण्यात आली. साध्य झाली नसल्यास त्या बाबतची कारणे यासह कार्यपूर्तता/साध्यता अहवाल तयार करण्यासाठी नियुक्त केलेल्या अभ्यास समितीने तयार केलेला अहवाल शासनास सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून राष्ट्रगीतानंतर बैठक संपल्याचे प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले.

सही/-
सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

सही/-
अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद